# ॥ राम मंत्राचे श्लोक ॥

समर्थ रामदासस्वामी

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

नको शास्त्र अभ्यास वित्पत्ति मोठी ।
जडे गर्व ताठा अभीमान पोटीं ॥
कसा कोणता नेणवे आजपा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥१॥

नको कंठ शोषूं बहूं वेदपाठीं ।
नको तूं पडूं साधनाचे कपाटीं ॥
घडे कर्म खोटें बहू तो दगा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥२॥

तुला ही तनू मानवी प्राप्त झाली ।
बहूजन्मपुण्यें फळालागिं आली ॥
तिला तूं कसा गोंविसि विषयीं रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥३॥

जरी ही तनू रक्षिसी पुष्ट कांहीं ।
तरी भोग तो रोग होईल देहीं ॥
विपत्तीपुढें ते न ये बोलतां रे ।
हरे राम हा मन्त्र सोपा जपा रे ॥४॥

खुळे हस्तपादादि हे भग्न होती ।
दिठी मंद होऊनियां कर्ण जाती ॥
तनू कंप सर्वांगिं होती कळा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥५॥

कफें कंठ हा रुद्ध होईल जेव्हां ।
अकस्मात तो प्राण जाईल तेंव्हां ॥
तुला कोण तेथें सखे सोयरे रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥६॥

तुझें बाळ तारुण्य गेलें निघोनी ।
कळेना कसे लोक जाती मरोनी ॥
करीसी मुलाची स्वहस्तें क्रिया रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥७॥

दुराशा नको रे परस्त्रीधनाची ।
नको तूं करूं नीच सेवा जनाची ॥
पराधीन कैसा मला दीससी रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥८॥

मदें डोलसी बोलसी साधुवृंदा ।
कसें हीत तूं नेणसी बुद्धिमंदा ॥
रिकामाचि तूं गुंतशी वाउगा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥९॥

बहू व्यापसंताप तो मूळपापा ।
गतायुष्य द्रव्यें न ये कोटि बापा ॥
कळेना तुला कोणता तो नफा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥१०॥

तुझे आप्त द्रव्यार्थि नुस्तेचि होती ।
तनू हे चितेमाजि कीं बोळवीती ॥
असें जाणुनी हीत कांहीं करा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥११॥

कुटुंबीं स्त्रिया पुत्र ते दासदासी ।
बहू पोषिसी सोसुनी दुःखरासी ॥
त्यजीं भार काबाड ओझें किती रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥१२॥

बहू इच्छिसी कीर्ति सन्मान कांहीं ।
सुखाचा तुला अंतरीं लेश नाहीं ॥
फुकाचें मुखीं नाम तें का न ये रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥१३॥

रवीसूत ते दूत विक्राळ येती ।
तुझ्या लिंगदेहासि ओढूनि नेती ।
तुला खंडिती मुंडिति दंडिती रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥१४॥

नको वीषयीं फारसा मस्त होऊं ।
नको मानदंभामधें चित्त गोवूं ॥
नको भस्म लावूं जटाभार का रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥१५॥

नको फार मंत्राग्निच्या मंत्रदीक्षा ।
नको जारणामारणादी अपेक्षा ॥
कळायुक्त चातुर्यता वीकळा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥१६॥

नको योग अष्टांग तो रोध प्राणा ।
नको कृच्छ्रचांद्रायणीं हट्ट जाणा ॥
अपभ्रंश हा मार्ग कीं वोखटा रे ।

हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥१७॥

कदापी घडेना व्रतें यज्ञदानें ।
नसे द्रव्यगांठीं करावें जयानें ।
घडे ना घडे यद्यपी कां फुका रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥१८॥

नसे सत्य कांहीं दिसे दों दिसांचें ।
तुला लूटिती चोरटे लोक साचे ॥
स्त्रिया पुत्र कामा न येती तुला रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥१९॥

नको तूं कदापी करूं तीर्थयात्रा ।
तनूदंडणीं क्षीणता सर्व गात्रां ॥
करी ग्रस्त आयुष्य तूं कोणसारे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥२०॥

तुला येम पाशीं करी बद्ध जेव्हां ।
सखा कोणता सोडवी सांग तेव्हां ॥
यमाला कदापी दया ते न ये रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥२१॥

तपस्वी मनस्वी भले पार गेले ।
दुजी सृष्टि कर्ते असे थोर मेले ॥
चिरंजीव कल्पायु गेले किती रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥२२॥

बहू कामधंद्यांमधें धांव घेसी ।
किती नांवरूपा जगीं मीरवीसी ॥
कशाला तुला उंट घोडे नगारे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥२३॥

म्हणे देश माझे भुमी गांव वाडे ।
शिबीकासनीं बैससी उंच लोडें ॥
कसा उंच तूं मंचकीं लोळसी रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥२४॥

दशग्रीव लंकापुरीं मस्त जाला ।
अकस्मात गेला पुरीमाजि घाला ॥
चिरंजीव दे राज्य बीभीषणा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥२५॥

अधोमूख विष्ठेमधें मायपोटीं ।
पचे पिंड हा सोसुनी दुःखकोटी ॥
स्मरेना कशी लाज नाहीं तुला रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥२६॥

असे भोगुनी पंचचत्वारि मासीं ।
पुढें दैवयोगें सख्या जन्मलासी ॥
कसा वीसरे ध्यान सोहं पुढें रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥२७॥

कळे वायुचा स्पर्श होतांचि जेंव्हां ।
रडे बाळ कोहं म्हणे जीव तेव्हां ॥
पुढें खेळ नानापरी खेळसी रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥२८॥

दिसंदीस माता पिता बंधु जाणे ।
परी रोग नाना करी तेथ ठाणें ॥
जरीं दैवयोगें पुढें वांचला रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥२९॥

करी लग्न मुंजी पितामाय त्याचें ।
करी शाहणा मारुनी रूप साचें ॥
करि पोटधंदा भला चांगला रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥३०॥

बहू पाळिलें पोषिलें मायबापीं ।
निघे भिन्न निंदूनियां पापरूपी ॥
स्त्रियेचेमुळें शेवटीं दुर्गती रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥३१॥

शतायू नव्हे पूर्ण आयुष्य कांहीं ।
असें हीत आहीत तें आद्य पांहीं ॥
अशाहीमध्यें बाळतारुण्य सारें ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥३२॥

करीशील धर्माश्रमा अस्त जेव्हां ।
बहू घातपाती घरीं होय तेव्हां ॥
भरीं पोट पोषीं कुटुंबा बरा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥३३॥

रवीऊदयोअस्त तों पोटधंदा ।
स्तवी आर्जवी तो करी येरमिंदा ॥
कळेना पुढें काय होणार तें रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥३४॥

बहू ढीग मागें पुढें मोहरांचे ।
मदोन्मत्त होऊनिया तेथ नाचे ॥
असे गर्व त्यालागिं नर्कासि थारे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥३५॥

अलंकारमानीं तनू सज्जवीतो ।
मना दर्पणीं पाहूनि रंजवीतो ॥
कळेना जळे सर्पणीं रूप तें रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३६ ॥

बहूं द्रव्य गांठीं पुन्हा मेळवीसी ।
गुरु विप्र बंधु कसे चाळवीसी ॥
दुराशा कशाला मशाला पुढें रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३७ ॥

जरी क्षीणदेहो परी वृद्धकाळीं ।
करीती स्त्रिया सूत नातू ढवाळी ॥
धना ऊचकी लागतां गूचकी रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३८ ॥

रवी जे घडी हाणितो काळ जेव्हां ।
श्रुति शब्द हे गर्जती तास तेव्हां ॥
म्हणे क्षीण आयुष्य गेलें तुझें रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३९ ॥

कसी जन्मुनी माय त्वां वांझ केली ।
कसी लाज वंशा कुळा लावियेली ॥
भुमीभार धोंडा पशु हा खरा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४० ॥

कसा कोणता काळ येईल केव्हां ।
दिनासारिखा काळ नेईल तेव्हां ॥
तुझें वित्त तारुण्य लोपेल सारें ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४१ ॥

तुला दंडिती खुंडिति कुंभपाकीं ।
तुला खंडुनी अग्निकुंडांत टाकी ॥
तुला ओढिती सांडसें तोडिती रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४२ ॥

असा उंच भोगूनियां कल्पकोटी ।
पुन्हा जन्म घे लक्षचौर्यांशि कोटी ॥
महासंकटीं हिंपुटी जीव सारे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४३ ॥

नको सोंग छंदें करूं ढोंग कांहीं ।
नको शिष्यशाखा मठीं सूख नाहीं ॥
महंतीमुळें नाश होतो तपा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४४ ॥

नको चाउटी वाउगी या जनांसी ।
हरीचिंतनीं ध्यास लावीं मनासी ॥
अमोलीक हा काळ जातो वृथा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४५ ॥

महाघोर हा थोर संसार मोठा ।
कळे संतसंगें समूळींच खोटा ॥
कळे भुक्ति मुक्ती विरक्तीच गा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४६ ॥

त्यजा दुष्टसंगा पहा रे भल्यांसी ।
करा हीत येऊं नका गर्भवासीं ॥
जसें अंतिचें दुःख होतें जिवा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४७ ॥

बहू भोगितां पूढती नर्क आहे ।
असें जाणुनी त्या सुखामाजि राहे ॥
प्रपंचीं उगा मारिसी कां गपा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४८ ॥

कलीं साधनें याविणें सर्व निंदीं ।
हरे राम हा मंत्र जो त्यासि वंदीं ॥
हरे राम हे माळिका साध का रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४९ ॥

॥ इति रामदासकृत राममंत्राचे श्लोक संपूर्ण ॥
॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

---

Please send corrections to Sunder Hattangadi (sunderh@hotmail.com)
Last updated on December 24, 1997